# दशावतारनाट्य : सामाजिक - सांस्कृतिक चिकित्सा

**डॉ.संदीप कदम**
साठ्ये महाविद्यालय, मुंबई
९९८७८६१३८८
sandipkadam127@gmail.com

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात दशावतारनाट्य, चित्रकथी, कळसूत्री बाहुल्या, धालोत्सव, चपई नृत्य आदी लोककला सादर केल्या जातात. या लोककलांपैकी 'दशावतारनाट्य' ही एक दक्षिण कोकणची स्वतंत्र ओळख मानता येईल अशी प्रयोगशरण लोकनाट्याची एक परंपरा आहे. दशावतारनाट्याची 'नाट्यप्रयोग' म्हणून काही प्रयोगमूल्ये आहेत. तसेच दशावतारनाट्याच्या प्रयोगातून प्रदेशनिष्ठ सामाजिक-सांस्कृतिक-भाषिक वेगळेपण जोपासले गेले आहे. त्याचा वेध घेत 'आज'च्या दशावतारनाट्याचे स्वरूप अभ्यासता येईल. दशावतारनाट्याचे 'नाट्यत्व' नाट्यसंहिता आणि भाषिक-अभाषिक घटक यात आहे. म्हणूनच या घटकांच्याआधारे दशावतारनाट्यातील आख्यान, आणि ऐतिहासिक संदर्भ यांचा शोध घेत आजच्या दशावतारनाट्याची चिकित्सा करणे संयुक्तिक ठरेल.

**दशावतारनाट्य :**

आदिम काळापासून नाट्यात्म लोकाविष्कार विविध स्वरूपात जोपासले गेले आहेत. संस्कृत वाङमयापासून ते आजपर्यंतच्या अनेक संदर्भान्वये ते लक्षात घेता येतात. संस्कृत वाङमयातील 'वेदां'मधील काही संवादसूक्त पाहता त्या सूक्तांमधून नाट्यात्मकता जाणवते. ('ऋग्वेद'मधील यम-यमी, अगस्ती-लोपामुद्रा, इन्द्र-इंद्राणी इत्यादी) भरतमुनींच्या 'नाट्यशास्त्र' ग्रंथातून लोकधर्मी आणि नाट्यधर्मी हे दोन अभिनयगुण अधोरेखित झालेले आहेत. हे अभिनय गुण लोकनाट्यातून आलेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. दशावतारनाट्याचे 'काल'च्या स्वरूपातील संदर्भशोध घेता संत रामदास यांच्या 'दासबोध' या रचनेत दशावतारनाट्याचा उल्लेख आलेला आहे. 'खेळतां नेटके दशावतारी| तेथें येती सुंदर नारी| नेत्र मोडिती कळाकुसरीं| परी ते अवघे धटींगण ||'[१] उपरोक्त सर्व संदर्भ लक्षात घेता दशावतारनाट्याला एक दीर्घ परंपरा असल्याचे लक्षात येते.

महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्हा अनेक जत्रोत्सवांसाठी प्रसिद्ध आहे. (श्री रवळनाथ, श्री वेतोबा, देवी सातेरी, तरंग देवता, पावणाई, भूतनाथ इत्यादी देवदेवतांच्या जत्रा) या जत्रोत्सवाच्या निमित्ताने दशावतारनाट्याचे सादरीकरण अनेक मंदिराच्या मंडपात किंवा मंदिर परिसरात होत असते. दशावतार लोकनाट्य सादर करण्याची कला अनेक दशावतार मंडळांनी पूर्वापार जोपासलेली आहे. (श्री आजगावकर दशावतार मंडळ, आजगाव; श्री नाईक मोचेमाडकर मंडळ, मोचेमाड; श्री पार्सेकर दशावतार मंडळ, वेंगुर्ला; श्री चेंदवणकर दशावतार मंडळ, चेंदवण इत्यादी) या दशावतार मंडळांसाठी 'पेटारा' ही एक महत्त्वाची बाब आहे. या पेटाऱ्यात दशावतार नाट्यासाठी लागणारी सामग्री ठेवलेली असते (मुखवटे, शस्त्रे, कपडे, इत्यादी) दशावतारनाट्य रंगमंचीत होण्यापूर्वी या पेटाऱ्याचे विधिवत पूजन केले जाते. या पेटाऱ्याला एक श्रद्धामूल्य आहे. दशावतारनाट्यास प्रारंभ

Research Hub International Journal

करण्यापूर्वी प्रत्येक मंडळ गणपतीचे पूजन करतात. प्रेक्षकांना रंगमंचावर प्रथमदर्शन गणपती आणि रिद्धी-सिद्धी यांचे होते. त्यानंतर नाट्यास प्रारंभ होतो. दशावतारनाट्य पूर्वार्ध आणि उत्तरार्ध अशा दोन भागामध्ये सादर होत असते. पूर्वार्धात आड-दशावतार आणि उत्तरार्धात कथाभागांवर आधारित नाट्य सादर केले जाते. यालाच 'दशावतारनाट्य' असे संबोधले जाते.

**दशावतारनाट्य रचनाबंध :**

कोकणातील दशावतारनाट्याला लिखित संहिता नसते तर निवडलेल्या (मंडळाने) कथाभागावर आधारित नाट्यसंहिता आकाररूप घेत सादर होते. रंगमंचावर नाट्य सादर होण्यापूर्वी निवडलेल्या कथाभागावर कलावंत चर्चा करून पात्रनिवड करतात. आदि-मध्य-अंत असे नाट्याचे स्वरूप ठरवून कलावंताच्या प्रवेशाचा क्रमही निश्चित केला जातो. या सर्व प्रक्रियेला 'कचेरी' असे म्हटले जाते. त्यानंतर रंगमंचावरच निवडीचा कथाभाग नाट्यसंहितेचे आकाररूप घेत प्रेक्षकसन्मुख होतो.

दशावतारनाट्याचा एक विशेष म्हणजे यात सर्व पुरूषपात्रे असतात. नायक, नायिका (स्त्रीपात्रांना 'स्त्रीपार्टी' असे संबोधले जाते.), खलनायक अशी पात्ररचना असते. उपरोक्त सर्व पात्रे नाट्यक्रम लक्षात घेऊन उत्स्फूर्तपणे संवादनिर्मिती करतात. दशावतारनाट्यात सूत्रधार कथासूत्र कथन करतो आणि 'सोंग' घेतलेली पात्रे संवाद साधत नाट्य सादर करतात. सूत्रधार प्रारभी मंगलाचरण म्हणत नंतर गणपतीस्तवन सादर करतो. या सादरीकरणातून प्रेक्षकांना आकर्षित केले जाते. दशावतारनाट्याची संहिता मौखिक असते. या संहितेत पूर्वरङ्गातील 'संकासूराचा वध' (मत्स्यावतार आख्यान) हा कथाभाग मुख्य असतो. संकासूराच्या वधानंतर उत्तररङ्गाला सुरूवात होते. या उत्तररङ्गात पुराणातील एखादे आख्यान सादर केले जाते.

**संकासूरवध आणि समाजसंस्कृती :**

दशावतारनाट्यातील संकासूरवधाच्या कथाभागाचे सूक्ष्मपणे सामजिक-सांस्कृतिकदृष्ट्या विश्लेषण करीत ऐतिहासिक संदर्भ तपासून घेऊ. पूर्वरङ्गातील 'संकासूर वध' हा कथाभाग सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा आहे. 'संकासूर वध' मधील संकासूराचे आगमन रंगमंचावर होण्यासाठी 'संकासूरा रेऽऽ महाविराऽऽ' अशी पदरचना आवर्तन-पुनरावर्तन स्वरूपात केली जाते, त्यावेळी संकासूराचा प्रवेश रंगमंचित होतो. संकासूराने वेद पळविल्याचे सूतोवाच ब्रम्हदेव हे पात्र करते. आणि संकासूराकडून वेद आणावयाचे कार्य ब्रम्हदेव हे पात्र विष्णूदेवतेवर सोपविते. त्यानंतर विष्णूदेवता आणि संकासूर यांमध्ये युद्ध होते. या कथाभागाचा संदर्भ श्रीसंत एकनाथगाथा भाग चार मध्ये पुढीलप्रमाणे येतो. 'वेद नेतां शंखासुरी| मत्स्य अवतार होय हरी ||१|| मारुनिया शंखासुरा| ब्रम्ह्या तोषविलें निर्धारा||२||'[२] 'संकासूर वध' या युद्धात संकासूराकडे कोयता, रापी ही शस्त्रे आहेत तर विष्णूच्या हातात तलवार आहे. विष्णूदेवतेपाशी असलेले हे शस्त्र 'प्रगत' म्हणावे असे आहे आणि संकासूराकडील रापी, कोयता हे 'अप्रगत' आहे. प्रगत विरूद्ध अप्रगत व्यवस्थेविषयीचा हा संघर्ष म्हणता येईल. 'विष्णू-संकासूर युद्धा'त संकासूर पराभवाच्या टप्प्यात असताना तो विष्णूला शरण जातो. त्याची ही कृती म्हणजे जीवनेच्छा म्हणावी लागेल. विष्णूकडे संकासूराने अभय मागताच विष्णू म्हणतो, "माझी भक्ती जो कोणी शंखावाचून म्हणजेच तुझ्यावाचून करेल त्याची भक्ती निष्फळ ठरेल" विष्णूचा हा उःशाप (अभय) म्हणजे संकासूर हा शंखरूपाने उच्चवर्णीयांच्या देवकार्यात आहे. 'काल' आणि 'आज'ही तो अस्तित्वात असल्याचे

दिसते आहे. म्हणजेच सामाजिक-सांस्कृतिकदृष्ट्या पाहता सूर म्हणजे आर्य आणि असूर म्हणजे अनार्य म्हणता येईल. कोकणातील लोककलांच्या अभ्यासक डॉ. पुष्पलता राजापूरे-तापस या 'विष्णू-संकासूरवधा'च्या कथाभागाविषयी जे प्रश्न उपस्थित करतात ते येथे पाहणे अनुचित ठरेल. "संकासूराला विष्णूदेवतेच्या पूजेत मान मिळतो याचा अर्थ असूराला 'सूरां'च्या धार्मिक व्यवस्थेत स्थान प्राप्त होते असा घेता येईल का?

एकीकडे सूरांच्या धार्मिक व्यवस्थेत असूराला स्थान देण्यासाठी त्याचा वध मात्र अटळ ठरला गेला. त्यामुळे त्याची संस्कृती ही पराभूत समाजाची संस्कृती असल्याचे सूरांना ठरविता आले. स्वाभाविकच पराभूतांना जेत्यांच्या समाजसंस्कृतीत स्थान नसते अंतिमतः त्यांच्या एकूण जीवनव्यवस्थेला, त्यांच्या मूल्यव्यवस्थेला शरण जावे लागते. ही 'सुरां'समोरील 'असूरां'ची अखंड शरणागतता शंखरूपाने अस्तित्वात आहे का?"[३] लोकसाहित्यातून असे समाजजीवनाविषयीचे अनेक संदर्भ व्यक्त होत असतात. दशावतारातील हा नाट्यप्रसंग समाजसंस्कृतीचे नाट्यमय दर्शन घडविणारा आहे. या नाट्यप्रसंगाला ऐतिहासिक संदर्भ आहे असे म्हणता येईल. 'आज'च्या परिप्रेक्ष्यात या नाट्यप्रसंगाचे अर्थनिर्णयन करावयाचे तर हा नाट्यप्रसंग प्रेक्षकांवर फारसा परिणाम करताना दिसत नाही. या नाट्यप्रसंगाला मूलतः एक शोकात्मता आहे. परंतु आज ती शोकात्मभाववृत्ती जाणवत नाही. संकासूराची वेदहननाची कृती लोकमनात 'दुष्टप्रवृत्ती' इतकीच मर्यादित राहिलेली दिसते. आजच्या प्रेक्षकाला ऐतिहासिक संस्कृती संघर्ष एकतर ज्ञात नाही वा केवळ मनोरंजन या हेतूनेच नाट्याचा आस्वाद प्रेक्षक घेत असावा. डॉ. पुष्पलता राजापूरे-तापस याविषयी म्हणतात, "आरंभीच्या काळात 'संकासूरवध' या नाट्यप्रसंगामागे समाज संस्कृतीचे जे संदर्भ होते ते आणि त्यामागील अर्थच्छटा 'आज' क्षीण झाल्यामुळे सदर नाट्यप्रसंग 'शोक'भाव व करूणरस निर्मिती करण्यास असमर्थ ठरत आहे."[४]

दशावतारनाट्यातील संकासूर वेदहननाची कथा आदिम सामाजिक, सांस्कृतिक जीवनभेदाला अधोरेखित करणारी आहे. वेदपठण करण्याचे म्हणजेच ज्ञान संपादित करण्याचे कार्य उच्च देवदेवता (गणपती, सरस्वती) यांपाशी असल्याचे लोकमनावर बिबवले आहे. हे संदर्भ लौकिक जीवनाशी पडताळून पाहावयाचे तर ते आर्य-अनार्य संस्कृतीभेदापर्यंत जाणारे आहेत. ज्ञान ग्राहणापासून अनार्य म्हणजेच बहुजन समाज वंचित राहिलेला आहे. ज्ञानग्रहण, संपादन यापासून आर्यांनी अनार्यांना वंचित ठेवण्याचा प्रयत्न केला त्यांनी ज्ञानात्म पातळीवरील वर्चस्व सदोदित स्वपाशी ठेवले. प्रस्तुत कथाभागातील संकासूराने वेद पळवून नेण्याची क्रिया करणे म्हणजे ज्ञान संपादन करण्याचा प्रयत्न करणे ही आहे. वर्णाधिष्टीत समाजव्यवस्थेत प्रचंड मोठा समहू हा ज्ञान ग्रहणापासून वंचित राहिलेला होता त्याचेच खरेतर हे निर्देशन या नाट्यातून होताना दिसते. दशावतारनाट्यातील संकासूरवध ही नाट्यकथा सामाजिक, सांस्कृतिक जीवनाच्या कथेला लोकसमूहासमोर ठेवताना दिसते, हे या कथाभागाचे सौंदर्यत्तर कार्य म्हणून नोंदविता येईल.

दशवतारनाट्यातील 'संकासूरवध' या कथाभागाने निर्माण केलेले गांभीर्य 'सोंग' (कुर्म, वराह अवतारातील) दर्शनाने कमी केले जाते. उत्तररङ्गामध्ये आख्याने सादर करण्याची पद्धत 'खेळ' स्वरूपात आहे. आणि शेवट ईशस्तवनाने होतो. उत्तररङ्गातील कथाभाग हा महाकाव्यसदृश्य रचना, पुराणकथा यांवर आधारित असतो. उत्तररङ्गातील नाट्याचे मूलस्रोत हे महाकाव्ये, कथा, मिथके यामध्ये आहेत. विषय आणि घटना-प्रसंगानुरूप पात्रांची वेशभूषा, रंगभूषा केली जाते. ती मूलतः संकेतबद्ध असते. 'खेळा'साठी निवडलेल्या विषयात

जर राजा हे पात्र असेल तर या पात्रासाठी काळा रंग निषिद्ध मानला गेला आहे. यातून सूर-असूर हा भेद निश्चित होतोच. तसेच सुष्ट-दुष्ट अशी पात्ररचनेची बांधणीही लक्षात येते. उपरोक्त संकासूरवधाच्या कथेमधील संकासूर याला काळा रंग आणि विष्णूला पांढरा रंग दिलेला आहे. हा काळा-पांढरा भेद समाजातील वर्णव्यवस्थेला अधोरेखित करणारा आहे. परस्परविरोधी उपयोजनेतून हे समाजवास्तव रंगमंचीय अवकाशात लक्षवेधी ठरते. लोकनाट्यातील ही रंगवेशभूषा समाजविचाराला, दृष्टीला अधोरेखित करणारी आहे.

लोकनाट्याचे सादरीकरण हे अनेकविध कलांना घेऊन होत असते. संगीत, नृत्य या कलांचे केलेले उपयोजनही लक्षणीय असते. डॉ. रमेश कुबल दशावतारनाट्याच्या तंत्राविषयी म्हणतात, “मराठी रंगभूमीवरील दशावतारी खेळ हा एक समर्थ नाट्याविष्कार आहे. रंगभूषा, वेशभूषा, गायन, वादन, नृत्य, युद्धाचे डावपेच, मल्लयुद्ध, तलवारींचे डावपेच, संवादचातुर्य यांतील कोकणी कलावंताचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. दशावतारी मंडळाचे शास्त्रवाचन, कल्पकता, अभिनय, गुण, मेहनत आणि पूर्वपरंपरेचे डोळस ज्ञान या बळावर दशावतारी नाटकाचे तंत्र विकसित झाले आहे. त्यामुळे दशावतारी रंगमंचाने आणि अभिनयतंत्राने मराठी रंगभूमीवर आपला खास ठसा उमटविला आहे.”५ पात्राच्या रंगमांचित होण्यापासून त्यांच्या निर्गमनापर्यंत नृत्य, संगीत याचे उपयोजन असते. दशावतारी नाट्याविष्कारात सूत्रधार वगळता ‘सोंग’ घेतलेली पात्रे आवश्यक तेथे नृत्यात्म हालचाली करीत लयबद्धता, तालबद्धता जोपासतात. लयबद्ध रचना ‘म्हणणी’च्या स्वरूपात सूत्रधार, कलावंत, सहकारी गातात.

उदाहरणार्थ,

मग बोलिले रुक्मिणी रमण | मत्स्य रूप धारण करून
समुद्र तळीशी जाईन | आपुले वेद आपणासी देईन ss
हे जिताम था थय्य था|

दशावतारनाट्यात पदन्यास, तालबद्धता यांना अतिशय महत्त्वाचे स्थान असते. ‘लढाई’ प्रसंग अभिनीत करताना समोरासमोर उभे राहून नट पदन्यास करीत गोल गोल फिरतात. त्यावेळी तालबद्धता जोपासली जाते. येथे नटांच्या देहबोलीला विशेष महत्त्व असते. दशावतारनाट्यात आहार्य, वाचिक आणि आंगिक अभिनय महत्त्वपूर्ण असतो. आहार्य अभिनय रंग आणि वेशभूषा यांमधून व्यक्त होतो तर संवाद आणि गीत यामधून वाचिक अभिनय अभिनीत होतो. तर आंगिक अभिनय हा प्रेक्षणीय असतो.

**दशावतारनाट्य - ‘व्हर्च्युल’ रूप :**

दशावतारनाट्याच्या पूर्वरङगात मालवणी बोलीचे उपयोजन केले जाते. उदाहरणार्थ, संकासूर म्हणतो, ‘राज्यात भय राजाचो. गावात भय गावकरांचो. देवळात भय देवाचो. रानात भय वाघाचो. आणि ह्या सभेत ह्या वाघाचो.’ मराठी रंगभूमीला याच मालवणी बोलीचे आकर्षण वाटलेले आहे. इंडियन नॅशनल थिएटरने ‘दशावतारी राजा’ हा नाट्यप्रयोग सादर केला होता. गंगाराम गवाणकर यांच्या ‘वस्त्रहरण’ या नाटकात मालवणी बोलीचे उपयोजन केलेले आहे. तसेच मच्छिंद्र कांबळी यांनीही मालवणी बोलीला नागररंगभूमीशी जोडले.

Research Hub International Journal

त्यांच्या नाट्यकृतीतून मालवणी बोलीचे संदर्भ येतात. आज मराठी रंगभूमीवर जे मालवणी बोलीचे उपयोजन दिसते त्याचे श्रेय आपणास 'काल'च्या दशावतारनाट्याला द्यावे लागेल.

'काल'च्या समाजात पारंपरिक जत्रोत्सवात जेव्हा दशावतारनाट्य सादर केली जात तेव्हा 'बिदागी' म्हणून धान्यरूपात भात दिले जाई. येथेही कोकणातील पर्यावरणीय विशेष लक्षात घेतला तर भातशेती हे प्रमुख पिक आहे. त्यामुळे कलावंतांना 'भात' देण्याची प्रथा होती. परंतु 'आज'च्या काळात 'बिदागी' म्हणून रोख रक्कम दिली जाते. आणि 'शिधा' म्हणून तांदूळ, तूरडाळ, तेल, बटाटे आदींचा समावेश असतो. 'काल' आणि 'आज' दशावतारनाट्यातील कलावंतांना जरी अल्प मानधन मिळत असले तरी त्यामागे त्यांची कलेप्रती असलेली निष्ठा ते जोपासत आहेत, हे प्रत्ययास येते. शासनाकडून काही मानधन नाही, सुविधा नाही त्यामुळे एकप्रकारची उदासीनता जाणवते रंगमंचावर खूप मानसन्मान मिळतो. पण पडद्यामागील जीवन फारच बिकट आहे. कला जगतात 'पर डे', पर नाइट' हे शब्द कलावंताना परिचित आहेत पण दशावतारनाट्य कलावंतांची याबबातीत उपेक्षा होत आहे, ही त्यांची शोकांतिका आहे, असे म्हणता येते.

दशावतारनाट्याला फेसबुक, यू-ट्यूब, इंटरनेटच्या माध्यमातून अनेक दशावतारनाट्य मंडळे लोकाभिमुख करीत आहेत. यामध्ये 'दशावतार कलेचे आम्ही पूजक' या यू-ट्यूब चॅनलवरुन अनेक दशावतारनाट्याचे सादरीकरण होत आहे. गुगल-पे वरुन साधारणतः रुपये वीस तिकीट विक्री केली जात आहे. उदाहरणार्थ, २४ जून २०२१ रोजी 'अंगविरहित नर' हे पौराणिक विषयावर नाट्य सादर करण्यात आले. त्याचबरोबर 'गोकर्ण महाबळेश्वर', 'महावीर बर्बरिक', 'आर्य चाणक्य', 'सती महानंदा', 'सुवर्णतुला', 'रती मदन', 'नागनिलमणि', 'भ्रमरासूर', 'कच देवयांनी', आदि नाट्ये या यू-ट्यूब चॅनलवरुन सादर केली आहेत. हा काळानुसार बदल होत आहे. आधुनिक तंत्रतेच्या या उपयोजनातून (यू-ट्यूब चॅनल) कथानकांना काल्पनिकतेची जोड मिळते आहे. नाटक, सिनेमानुसार नावे दिली जात आहेत. उदाहरणार्थ, १६ ऑगस्ट २०२१ रोजी ७.०० वाजता 'अधांतरी हे झुले नभांगण' हे दशावतारी नाट्य 'दशावतार कलेचे आम्ही पूजक' यांनी यू-ट्यूब चॅनलच्या माध्यमातून सादर केले आहे. तसेच नितीन आसयेकर फॅन्स क्लबने 'दुष्यंत शकुंतला' हे पौराणिक विषयावर ऑनलाइन लाईव्ह नाट्य सादर केले आहे. संयुक्त पौराणिक दशावतार नाट्यप्रयोग वेंगुर्ले यांनी 'फळांच्या पेटीत भाग्यरेषा' हे नाटक २८ ऑगस्ट २०२१ रोजी सादर झाले. एकूणच एकमेकांच्या मदतीने कोकणातील दशावतारी कलावंत ही कला आज 'व्हर्च्युल' स्वरूपात जोपासताना दिसत आहेत. 'आज' दशावताराला 'व्हर्च्युल' रूप प्राप्त होत आहे. हे बदलत्या काळाचे स्वरूप म्हणावे लागेल. साधारणतः दिवाळी नंतर सुरू होणारे दशावतार जत्रांमधून सादर होत असत. आज ही लोककला यू-ट्यूबच्या माध्यमातून व्हर्च्युल झाली आहे. 'परिवर्तन दशावताराचे' या उपक्रमांतर्गत दशावतारी नाट्यमंडळे शुटिंग करून दशावतार लोकाभिमुख करीत आहेत. आज दशावतारनाट्य व्हर्च्युल रूप घेत आहे. एकूणच, लोककलेचे हे एक प्रकारे डॉक्यूमेंटेशन होत आहे, असेही आपणास म्हणता येईल.

**सारांश :**

दक्षिण कोकणातील 'दशावतारनाट्य' हे एक प्रयोगशरण लोकनाट्य आहे. या लोकनाट्याला एक दीर्घ परंपरा आहे. दशावतारनाट्याचे सादरीकरण जत्रोत्सवाच्या निमित्ताने अनेक मंदिराच्या मंडपात किंवा मंदिर

परिसरात केले जाते. दशावतारनाट्य रंगमंचीत होण्यापूर्वी 'पेटाऱ्या'चे विधिवत पूजन केले जाते. या पेटाऱ्याला एक श्रद्धामूल्य आहे. दशावतारनाट्य पूर्वार्ध आणि उत्तरार्ध अशा दोन भागामध्ये सादर केले जाते. पूर्वरङ्गात 'संकासूराचा वध' (मत्स्यावतार आख्यान) हा कथाभाग मुख्य असतो. संकासूरवधानंतर उत्तररङ्गाला सुरूवात होते. या उत्तररङ्गात पुराणातील एखादे आख्यान सादर केले जाते. पूर्वरङ्गात 'संकासूराचा वध' हा नाट्यप्रसंग समाजसंस्कृतीचे नाट्यमय दर्शन घडविणारा आहे. या नाट्यप्रसंगाला ऐतिहासिक संदर्भ आहे. संकासूरवध ही नाट्यकथा सामाजिक, सांस्कृतिक जीवनाच्या कथेला लोकसमूहासमोर ठेवताना दिसते, हे सौंदर्यत्तर कार्य आहे.

दशावतारनाट्याचे सादरीकरण रंगभूषा, वेशभूषा, संगीत, गायन, वादन, नृत्य, अभिनय आदी कलांना घेऊन होत असते. दशावतारी नाट्याविष्कारात सूत्रधार वगळता 'सोंग' घेतलेली पात्रे लयबद्ध, तालबद्ध हालचाली जोपासतात. मराठी रंगभूमीवर आज मालवणी बोलीचे उपयोजन दिसते आहे, त्याचे श्रेय 'काल'च्या दशावतारनाट्यात आहे. आज दशावतारनाट्य 'मागणी तसा पुरवठा' या स्वरूपात सादर होत आहे. त्यामुळे 'आज' दशावतारनाट्याला 'व्हर्च्युल' रूप प्राप्त होताना दिसते आहे, हा कालानुरूप बदल म्हणून नोंदविता येतो. हा दशावतारनाट्यातील बदल 'डॉक्यूमेंटेशन'दृष्ट्या अतिशय महत्वपूर्ण ठरेल, असा विश्वास वाटतो.

**संदर्भ :**

१. दासबोध/दशक सहावा (देवशोधन), समास आठवा (दृश्यनिरुपण), ओवी११,
https://mr.wikisource.org/wiki/%E0%A4%A6%E0%A4%BE%E0%A4%B8%E0%A4%AC%E0%A5%8B%E0%A4%A7
२. श्रीसंतएकनाथ **गाथा - भाग** चवथा, अभंग क्रमांक ३३४४,
https://www.transliteral.org/pages/i100121021559/view
३. डॉ. राजापूरे-तापस पुष्पलता, कोकणातील लोककला, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१४,पृ.४४

४. तत्रेव पृ.४४

५. डॉ. कुबल रमेश, लोकसाहित्याचे अंतरंग, मुंबई विद्यापीठ, मराठी विभाग आणि शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर,२०१४, पृ.१३४